महासत्ता

# शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळांसाठी १७ टक्के मतदान

**कोल्हापूर, ता.१४ (प्रतिनिधी):**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळे या अधिकार मंडळांसाठी सोमवारी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांत ३३ केंद्रांवर मतदान प्रक्रीया शांततामय वातावरणात पार पडली, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली.

मतदार संघनिहाय झालेल्या मतदानाची एकूण टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे. अधिसभा शिक्षक मतदार संघासाठी एकूण २९४५ मतदार असून त्यापैकी २७४९ मतदारांनी आपले मतदान केले त्यामुळे ही मतदानाची टक्केवारी ९३.३४% इतकी आहे, आधीसभा विद्यापीठ शिक्षक मतदार संघासाठी १६६ मतदार असून त्यापैकी १६० मतदारांनी मतदान केले, त्यामुळे मतदानाची टक्केवारी ९६.३९% झाली आहे, आधी सभा नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघासाठी ३६ हजार ३४३ मतदार असून यापैकी ११ हजार १३१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला, त्यामुळे ही मतदानाची टक्केवारी ३०.६३% इतकी आहे, विद्या परिषद शिक्षक मतदार संघासाठी ३३११ मतदार असून त्यापैकी २९०८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला यामुळे झालेल्या मतदानाची टक्केवारी ९३.४७% इतकी आहे तर अभ्यास मंडळासाठी ४३६ मतदार असून त्यापैकी ४२६ मतदारांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावला त्यामुळे ही टक्केवारी ९७.७१% इतकी आहे, असेही निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डी व्ही शिंदे यांनी कळविले आहे. बुधवार १६ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणुकीची मतमोजणी आज

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांच्या निवडणुकीची मतमोजणी उद्या (ता. १६) होत आहे. विद्यापीठातील परीक्षा भवन दोनमध्ये सकाळी आठ वाजता मतमोजणीस प्रारंभ होईल. संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होण्यास किमान २४ तास लागतील, असे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

अधिसभेच्या ३९, विद्या परिषद आठ व प्रत्येक अभ्यासमंडळावर तीन सदस्य या जागांसाठी सोमवारी (ता. १४) मतदान झाले. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिव-शाहू आघाडी निवडणुकीत आमने-सामने आली. यंदाच्या निवडणुकीत जोरदार प्रचार झाला. तसेच मतदान केंद्रांवर कार्यकर्त्यांची रेलचेल पाहायला मिळाली. मतदान झाल्यानंतर दोन्ही आघाड्यांकडून मतांचा हिशेब करण्यात आला. नोंदणीकृत पदवीधर गटासाठी कमी मतदान झाल्याने उमेदवारांना किती मते पडतील, याचा अंदाजही बांधण्यात आला.

उद्याच्या मतमोजणीकडे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांचे लक्ष लागले आहे. आठ वाजता मतमोजणीस सुरुवात होणार असून, पहिला निकाल अकरा वाजेपर्यंत जाहीर केला जाण्याची शक्यता आहे. पसंती क्रमाने मतदान झाल्याने सर्व निकाल जाहीर करण्यास दुसरा दिवस उजाडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाची आज मतमोजणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यात ३३ मतदान केंद्रावर सोमवारी मतदान झाले. आज (दि. १६) मतमोजणी असून रात्री उशिरा निकालाचा कौल स्पष्ट होईल. विद्यापीठ विकास आघाडी आणि शिव-शाहू आघाडीमध्ये रस्सीखेच होणार असली तरी मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठावर कोणाचे वर्चस्व राहणार हे स्पष्ट होईल.

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी गेल्या महिन्याभरापासून निवडणुकीची धामधूम सुरू होती. मतदारांची नोंदणी, अर्ज भरणे, मागार घेणे यानंतर उमेदवारांची अंतिम यादी जाहीर झाली. त्यानंतर कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यात एकमेकांच्या विरोधात प्रचाराच्या तोफा धडाडत होत्या. सोमवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली. तर आज (दि. १६)



- **निवडणुकीच्या निकालाचा कौल रात्री उशिरापर्यंत होणार स्पष्ट**

रोजी सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरूवात होणार आहे. शिक्षक, विद्यापीठ शिक्षक आणि अभ्यास मंडळ मतदार संघाची मतमोजणी दुपारपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. परंतू पदवीधर मतदार संघाची मतमोजणी रात्री उशिरापर्यंत सुरू राहणार असल्याची शक्यता निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

पुण्यनगरी



# 'सिनेट'चा आज फैसला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांची (सिनेट) मतमोजणी बुधवारी विद्यापीठात होणार आहे. सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. सोमवारी सिनेटसाठी मतदान पार पडले. विद्यापीठ विकास आघाडीने यापूर्वीच अनेक जागा बिनविरोध करून वर्चस्व प्रस्थापित केले आहे. आता नव्याने निर्माण झालेल्या शिव-शाहू आघाडीच्या कामगिरीकडे शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष आहे.

पुढारी

# विद्यापीठ अधिकार मंडळ निवडणुकीचा आज निकाल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळ निवडणुकीचा निकाल बुधवारी (दि.१६) जाहीर होणार आहे. सकाळी आठ वाजल्यापासून परीक्षा भवन दोनमध्ये मतमोजणी होणार आहे. सायंकाळपर्यंत विद्यापीठावर कोणाचे वर्चस्व राहणार याचे चित्र स्पष्ट होईल.

**विकास आघाडी की सुटा-शिवशाहू आघाडी, याची उत्सुकता**

शिवाजी विद्यापीठ निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. रविवारी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ३३ केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया पार पडली. यापूर्वीच विकास आघाडी व 'सुटा'चे ७० उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यावेळच्या निवडणुकीत अधिसभा शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर, अभ्यास मंडळासाठी चुरशीने मतदान झाले आहे. पदवीधरमध्ये मोठ्या प्रमाणात मतदार नोंदणी होऊनही मतदान टक्केवारी फारच कमी आहे. बुधवारी प्रत्यक्ष मतमोजणी झाल्यानंतरच निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडी यंदा बहुमत मिळवणार की 'सुटा' आणि शिव-शाहू आघाडी मुसंडी मारणार याची शिक्षण क्षेत्रास उत्सुकता आहे.

जनसंपर्क कक्ष
16 NOV 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षक गटातील निकाल पहिल्यांदा लागणार

## 'सिनेट'वरील सत्तेचा आज फैसला : परीक्षा भवनमध्ये मतमोजणी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिसभा (सिनेट) आणि अन्य अधिकार मंडळांवर विद्यापीठ विकास आघाडी वर्चस्व कायम राखणार की, सुटा आणि शिव-शाहू आघाडी मुसंडी मारणार याचा फैसला आज, बुधवारी होणार आहे. विद्यापीठातील परीक्षा भवन क्रमांक दोनमध्ये सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीची प्रक्रिया सुरू होणार आहे. विद्यापीठ शिक्षक गटातील निकाल पहिल्यांदा लागणार आहे.

विद्यापीठ शिक्षक गटात १६६ पैकी १६० मतदान झाले. अन्य गटांच्या तुलनेत या मतदानाची संख्या कमी आहे. त्यामुळे या गटातील निकाल पहिल्यांदा जाहीर होईल. त्यानंतर अभ्यास मंडळे, अधिसभा शिक्षक, विद्यापरिषद शिक्षक आणि नोंदणीकृत पदवीधर असा क्रम राहण्याची शक्यता आहे. पसंतीक्रमानुसार मतदान झाले असल्याने मतमोजणीला जादा वेळ लागणार आहे. गेल्या निवडणुकीतील मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होण्यास २३ तास लागले होते. यावेळी त्याहून अधिक वेळ लागणार आहे. दरम्यान, मतमोजणीची सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठात बिरसा मुंडा जयंती साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामध्ये बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या हस्ते विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, भूगोलाशास्त्र विभागातील प्रा. डॉ. जगदीश सपकाळे, इतिहास अधिविभागातील साहाय्यक प्राध्यापक दत्तात्रय मचाले, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात बिरसा मुंडा यांची जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या हस्ते विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे, डॉ. जगदीश सपकाळे, सहा. प्राध्यापक दत्तात्रय मचाले, डॉ. नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
16 NOV 2022
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुस्तरीय कृषी विपणन आवश्यक

## अशोक दलवाई : शिवाजी विद्यापीठात कृषी विपणन परिषदेस प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिकस्तरावर जर 'वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन'सारखी एकात्मिक व्यवस्था उभी राहात असेल, तर भारतासारख्या देशात 'सिंगल नेशन, सिंगल मार्केट' सहज उभे राहू शकते, याचा विचार करायला हवा. अशा बहुस्तरीय पद्धतीने कृषी विपणन क्षेत्राचा क्रियाशील विस्तार करणे शक्य आहे, असे प्रतिपादन भारत सरकारचे केंद्रीय सचिव डॉ. अशोक दलवाई यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग आणि हैदराबाद येथील दि इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रीकल्चरल मार्केटिंग ) यांच्यातर्फे कृषी विपणन या विषयावरील आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. शाश्वत पर्यावरणीय विकास या बाबीला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे. त्यातून शेती व शेतकऱ्याचे शाश्वत जगणे विकसित व्हायला हवे. त्यादृष्टीने पाणी, ऊर्जास्रोतांचे काटेकोर नियोजन व व्यवस्थापन, शाश्वत कृषी उत्पादनावर विपरीत परिणाम करणारी खते, आदींबाबत या परिषदेत विचार केला जावा, अशी अपेक्षा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात यांनी व्यक्त केली. नाबार्डचे मुख्य सरव्यवस्थापक डॉ. सत्यसाई, जागतिक बँकेचे अर्थतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर रानडे उपस्थित होते.

### आधुनिकीकरण आवश्यक...

कृषी विपणनाच्या क्षेत्रात नवतंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिकीकरण आवश्यक आहे. कृषी उत्पादन अधिक काळ ताजे व टिकाऊ राहण्यासाठी पॅकिंग, साठवण, वाहतूक, वितरण या प्रणालींमध्ये आवश्यक ते बदल करायला हवेत, असे 'आयएसएएम'चे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव यांनी सांगितले.

16 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मंगळूरू विद्यापीठात स्तुती कार्यक्रमाचे उद्घाटन

## डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली आधुनिक उपकरणांची माहिती

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातर्फे प्रायोजित व कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने 'सात दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम"चे आयोजन मंगळूरू विद्यापीठ, मंगलगंगोत्री येथे आयोजित केले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. के. बी. गुडासी यांच्या हस्ते झाले. आधुनिक उपकरणे हाताळण्याची योग्य प्रक्रिया, परिणाम मिळवणे आणि उपकरणांचे महत्त्व यासह विविध योजनांद्वारे संशोधनाला सरकार प्रोत्साहन देत आहे.

मंगळूरू येथील कार्यक्रमात प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासासाठी सरकार राबवित आसलेल्या अनेक योजनांचा उल्लेख केला. त्याचबरोबर त्यांनी आत्मनिर्भर भारताची गरज पूर्ण करणारे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ विकसित करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले.




**कोल्हापूर : मंगळूरू विद्यापीठात स्तुती कार्यक्रमाचे उद्घाटन करताना स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे. सोबत कर्नाटक विद्यापीठाचे प्रा. बी. विशालाक्षी, कुलगुरू प्रा. गुडासी, कुलगुरू प्रा. सुब्रह्मण्य यादपादितय, प्रा. बोजा पुजारी.**

अध्यक्षस्थानावरून बोलताना मंगळूरू विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. पी. सुब्रह्मण्य यादपादितय म्हणाले, मंगळूरू विद्यापीठात अनेक आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रे असून, येथे समाजोपयोगी संशोधन होत आहे. स्तुति प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्याच्या चांगल्या उपक्रमाबद्दल भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अभिनंदन केले. त्याचबरोबर ही संधी मंगळूरू विद्यापीठाला मिळवून दिल्याबद्दल डॉ. सोनकवडे यांचे आभार मानले. आठवड्यामध्ये देशभरातील ४० संशोधक प्रशिक्षण घेणार आहेत. संशोधनात अत्याधुनिक उपकरणांचा वापर करण्याविषयी नामवंत प्राध्यापक आणि नामांकित संस्थांचे शास्त्रज्ञ आणि ॲप्लिकेशन इंजिनिअर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी संसाधन व्यक्ती म्हणून सहभागी होणार आहेत. प्रशिक्षण कार्यक्रमाचे सह–संयोजक प्रा. करुणाकर एन. यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. बी. विशालाक्षी यांनी स्वागत केले. लाविना ग्लॅडिस सेराव यांनी सूत्रसंचालन केले प्रा. बोजा पुजारी यांनी आभार मानले.

16 NOV 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विज्ञानाच्या विश्वात



डॉ. व्ही.एन. शिंदे

# ई- कचरा

'असलं तर लागतं, अन् नसलं तर भागतं', 'नवं ते हवं', 'जूनं ते सोनं' अशा एकापाठोपाठ एक म्हणी आठवू लागल्या. कारण बातमी तशीच वाचली. 'जगभरात या वर्षी ५.४ अब्ज मोबाईल फोन कचऱ्यात जाणार' ही ती बातमी. मानवाचा हव्यास, नव्याचा सोस, त्यामध्ये गुंतलेले मन आणि मनाचे चोचले पुरवणारे उद्योजक. यामध्ये आपण पृथ्वीवरील एकूण संसाधनांचा किती ऱ्हास करणार आहोत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

सोळाव्या शतकापासून विद्युत आणि चुंबकीय ऊर्जेचा वैज्ञानिक स्वतंत्रपणे विचार करू लागले. या दोन्ही घटकांवर संशोधन सुरू झाले. अलेस्सांड्रो व्होल्टांनी विद्युत घटांची निर्मिती केली. चुंबकांचा वापर पूर्वीपासून मानव करत होता. जेम्स क्लर्क मॅक्सवेल नावाचा एक संशोधक, त्याने स्वतःचे नवे काही शोधले नाही. मात्र, ॲम्पिअर, गॉस आणि फॅराडेंच्या सूत्रांची वेगळ्या पद्धतीने मांडणी केली. विद्युत आणि चुंबकीय क्षेत्रांचा परस्पर संबंध मांडला. यातून विद्युत चुंबकीय लहरींची निर्मिती आणि उपयोग यावर संशोधन झाले. मॅक्सवेलच्या कार्याने दळणवळणाची क्रांती झाली. रेडिओ तरंगांची संकल्पना प्रत्यक्षात आली. बिनतारी संदेशवहनाची सुरुवात झाली. रेडिओ आणि नंतर दूरचित्रवाणीचा शोध लागला. पुढे पेजर आले आणि इतिहासजमाही झाले. मोबाईल संदेशवहन सुरू झाले. टूजी, थ्रीजी, फोरजी पाठोपाठ फाईव्हजी आले. त्यासाठी मोबाईल संचाची निर्मिती झाली. मोठ्या मोबाईल फोनची जागा स्लीम किंवा पातळ संचांनी घेतली. उत्पादक कंपन्या नवनव्या मॉडेलची निर्मिती करत आहेत. दररोज भ्रमणध्वनी संच नव्या रूपात येतात. नवा संच आला की तो घ्यावासा वाटतो. काहीजण जुना संच बिघडला म्हणून नवा घेतात. मात्र, बहुतांश लोक आपण काळाबरोबर आहोत हे लोकांना दिसावे म्हणून बदलतात. जुना संच देऊन, नवा संच घेणाऱ्या लोकांचे प्रमाण चाळीस टक्केपेक्षा कमी आहे. बाकी लोक जुना संच घरात ठेवून नवा खरेदी करतात. जागतिक व्यापार संघटनेच्या सर्वेक्षणात ही बाब आढळली आहे. जगाची लोकसंख्या आठ अब्ज आहे. मात्र, जगात आज वापरात असलेले व सुस्थितीतील घरात पडून असलेल्या भ्रमणध्वनी संचांची संख्या सोळा अब्ज आहे. जगात भ्रमणध्वनी वापरू शकेल अशा वयोगटाच्या लोकसंख्येच्या तिप्पट संच आहेत. खरं तर इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये अनेक मौल्यवान खनिजे असतात. ती किमतीने महाग नाहीत; मात्र त्यांचे साठे मर्यादित असल्याने मौल्यवान ठरतात. तारांमधून तांबे, बॅटरीमधील कोबॉल्ट ही काही उदाहरणे. सोने, चांदी, पॅलेडियम, कॅडमियम, लिथियम, इरिडियम अशी मूलद्रव्येही असतात. आपल्या एका संचात असणारे काही मूलद्रव्यांचे प्रमाण केवळ काही मिलीग्रॅम असते. मात्र, अब्जावधी वस्तूतील एकत्रित वस्तुमान टनांमध्ये भरते. धुलाई यंत्र, दूरदर्शन संच, मोबाईल, जीपीएस प्रणाली यंत्र, संगणक, टॅब्लेट, लॅपटॉप, टोस्टर इत्यादींचा कचरा २०३० सालापर्यंत ७४ दशलक्ष टन इतका तयार होईल. रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री या संस्थेने नव्या उत्पादनासाठी जुन्या उपकरणांचे रिसायकलिंग करून मिळवलेले धातू वापरण्यास प्रोत्साहन देण्याचे सूचवले आहे. आज केवळ जगातील १७ टक्के इलेक्ट्रॉनिक वस्तू पुनर्निर्मितीसाठी जातात. पुढील वर्षात हे प्रमाण ३० टक्केपर्यंत नेण्याचे आवाहन संयुक्त राष्ट्रसंघाने केले आहे. ई-कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस महाकठीण बनत आहे. या कचऱ्यामध्ये मानवी शरीराला तसेच एकूण जीवसृष्टीला हानिकारक घटक असतात. एकट्या इंग्लंडमध्ये दोन कोटींपेक्षा जास्त वस्तू घराघरात पडून आहेत. त्यांची किंमत ५.६३ अब्ज पौंड आहे. या वस्तू विकून प्रत्येक कुटुंबाला २०० पौंड मिळू शकतात. लेख लिहिताना एका पौंडचा असणारा दर रु. ९५.१४ पाहता प्रत्येक कुटुंबास साधारण १९ हजार रुपये मिळतील. आपले वागणेही वेगळे नाही. ३० हजाराला घेतलेला मोबाईल पाचशे किंवा हजार रुपयात परत देण्यापेक्षा तो घरात ठेवतो. ही वृत्ती बदलायला हवी. कारण त्यात केवळ पैसे नाही, तर दुर्मिळ मूलद्रव्येही अडकून पडतात. इ-कचऱ्याच्या बाबतीत भारताचा जगात पाचवा क्रमांक आहे. भारतात दरवर्षी दहा लक्ष वस्तूंचा कचरा होतो. त्यात ७० टक्के जड धातू किंवा मौल्यवान धातू असतात. यातील केवळ दहा टक्के कचरा पुनर्निर्मितीसाठी जातो. हा कचरा निसर्गात तसाच पडून राहणे, त्याची हळूहळू झीज होत माती, पाणी आणि हवेत मिसळणे, वनस्पती, प्राणी आणि मानवाच्या आरोग्याच्या दृष्टीने खूपच घातक असते. इलेक्ट्रॉनिक कचऱ्यातून धातू वेगळे करणे आणि त्यांचा पुनर्वापर करणे जास्त खर्चाचे असते. त्यामुळे कमी खर्चात निसर्गातून मिळणारे धातू उत्पादन प्रक्रियेत वापरण्यास उत्पादक पसंती देतात. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचा प्रश्न आणखी गंभीर बनतो. हा कचरा कमी करण्यासाठी एक उपाय सूचवावासा वाटतो. सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या किमती दुप्पट ठेवाव्यात. जी व्यक्ती जुना संच, उपकरण परत देऊन नवी वस्तू घेईल त्यास पन्नास टक्के सवलत द्यावी. जो हे करणार नाही, त्याच्याकडून घेतलेली अतिरिक्त रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी द्यावी. त्यांनी कचऱ्यात येणाऱ्या वस्तू त्या-त्या कंपन्यांपर्यंत पोहोचवाव्यात.

काही वर्षांपूर्वी जपानमध्ये एका भागातील लोक चालताना, हालचाल करताना 'इटाई... इटाई' असा जप करू लागले. ते काही विठ्ठलाचे भक्त नव्हते. त्यांची हाडे दुखत होती. साथीसारखा हा आजार पसरला. पाणी आणि अन्नाचे परीक्षण केल्यानंतर असे लक्षात आले की, ई-कचरा तेथील माळरानावर मोठ्या प्रमाणात टाकला होता. त्यातील कॅडमियम मातीत मिसळले, ते भातात उतरत होते. कॅडमियमयुक्त भातातून ते शरीरात जाऊन हाडांना ईजा पोहोचवत होते. त्यामुळे लोकांना हा त्रास होत होता. असा धोका कोठेही निर्माण होऊ शकतो. त्यासाठी 'बायबॅक पद्धत' आवर्जून स्वीकारायला हवी.

संपर्क : ९६७३७८४४००

16 NOV 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नाईट कॉलेजची विजयी सलामी

## विद्यापीठ आंतरविभागीय खो-खो स्पर्धा प्रथमच मॅटवर



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुषांच्या मॅटवरील खो-खो स्पर्धेत मंगळवारी झालेल्या एका सामन्यातील क्षण.

**इचलकरंजी, ता. १५ :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुषांच्या खो-खो स्पर्धेत नाईट कॉलेज इचलकरंजीने बोरगाव कॉलेजवर एक डाव व १५ गुणांनी विजय मिळवत विजयी सलामी दिली. येथील नाईट कॉलेज आणि रोटरी क्लब ऑफ हेरिटेज यांच्यातर्फे ही स्पर्धा आजपासून जयहिंद मंडळाच्या क्रीडांगणावर सुरू झाली.

खंजिरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुणराव खंजिरे, रोटरी क्लब हेरिटेजचे अध्यक्ष रोहित शहा, मनोज झंवर, जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष राजन उरूणकर, प्राचार्य डॉ. पुरंदर नारे उपस्थित होते. निवड समिती सदस्य प्रा. एच. ए. पाचोरे, प्रा. देवेंद्र बिरनाळे, प्रा. आर. एम. पाटील, निरीक्षक डॉ. सुनील चव्हाण उपस्थित होते. प्रा. सौरभ पाटणकर यांनी सूत्रसंचालन केले. तर, प्रा. देवेंद्र बिरनाळे यांनी आभार मानले.

पहिला सामना नाईट कॉलेज विरुद्ध बोरगाव कॉलेज असा रंगला. नाईट कॉलेजने सरस खेळ करत बोरगावला एक डाव व १५ गुणांनी हरविले. दुसरा सामना ए.बी.एम. कॉलेज (रहिमतपूर) विरुद्ध एस. के. पाटील महाविद्यालय (कुरूंदवाड) यांच्यात झाला. पाटील महाविद्यालयाने एक डाव आणि ७ गुणांनी सहज विजय मिळविला. अण्णासाहेब डांगे महाविद्यालय (हातकणंगले) आणि केडब्ल्यूसी (सांगली) यांच्यातील लढत अटीतटीची झाली. सांगलीचा संघ ३० सेकंद व ३ गुणांनी विजयी झाला. व्यंकटेश महाविद्यालय (इचलकरंजी) ने मुधोजी कॉलेज (फलटण) वर २.२० मिनिटे आणि २ गुणांनी विजय मिळविला. पतंगराव कदम महाविद्यालय, एन. डी. पाटील महाविद्यालय (सांगली) यांनी प्रतिस्पर्धी मात करीत पुढील फेरी गाठली. बुधवारी (ता. १६) सकाळच्या सत्रात साखळी व बाद फेरीचे सामने तर सायंकाळच्या सत्रात अंतिम लढती होतील.

### निर्णयाचे स्वागत

शिवाजी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या खो-खो आंतरविभागीय स्पर्धा शारीरिक संचालकांनी यंदा मॅटवर खो-खो स्पर्धा खेळविण्याचा निर्णय घेतला. यामुळे स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच मॅटवर स्पर्धा झाली. या निर्णयाचे सर्वांकडून स्वागत करण्यात आले.